पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/०२/२०१६** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/०२/२०१६** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ननवरे जितेंद्र बाबा
३. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
५. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.बेंडे - प्रशासन अधिकारी, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस अनुदान देणेबाबत -

विषय क्र.२) महापौर चषक राज्यस्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेबाबत - मा.संगीता पवार, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) मराठी राजभाषा दिन साजरा करणेबाबत - मा.अरुण बो-हाडे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक -मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक - मा.अरुण बो-हाडे

मुरुड येथील समुद्रामध्ये पुणे येथील अबेदा इनामदार महाविद्यालयातील १४ विद्यार्थी / विद्यार्थीनींचा बुडून मृत्यू झालेला असल्याने त्यांना सभेमध्ये श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

----------

दिनांक २०/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ०३/०२/२०१६ विभाग - क्रीडा
सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/कॅश/कावि/७७/२०१६, दि.०१/०२/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे ह्दयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडीतांना मदत म्हणून महापालिकेकडून प्रतिवर्षी मिळणा-या र.रू.२५,००,०००/- या अनुदान रकमेतून अर्थसहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१८/१२/२००७ अन्वये या ट्रस्टला दरवर्षी २५ लाख एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे. मा.महापौर तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी, पुणे ४११०१८ यांनी दि.१२/१/२०१६ चे पत्रान्वये सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील र.रू.२५,००,०००/- ट्रस्टला मिळणेकामी मागणी केलेली आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेस र.रू.२५ लाख अनुदान देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक – ०२
दिनांक - ०३/०२/२०१६
सुचक : मा.संगीता पवार अनुमोदक : मा.नितीन लांडगे
संदर्भ : मा.संगीता पवार, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड शहर बॉक्सिंग असोसिएशन यांच्या सहकार्याने माहे मार्च २०१६ मध्ये कै.प्रबोधनकार केशव ठाकरे क्रीडा संकुल यमुनानगर, निगडी, पुणे ४४ येथे महापौर चषक राज्यस्तर बॉक्सिंग स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रु.९,२३,५५०/- चे खर्चास मान्यता तसेच स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था, गॅलरी खर्च र.रु.८०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित प्रभाग व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च र.रु.५०,०००/- हा विद्युत विभाग संबंधित प्रभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.७,९३,५५०/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस व प्रमाणपत्रे, निमंत्रणपत्रिका, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर्स, मेडल्स, ट्रॉफीज, मानचिन्हे, टोप्या, क्रीडा साहित्य, ग्लोव्हज व हेड गार्ड इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७ विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०३/०२/२०१६

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव -

दिनांक २७ फेब्रुवारी २०१६ हा " मराठी राजभाषा दिन " साजरा करण्यात यावा. ज्येष्ठ साहित्यिक आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत समारंभाचे आयोजन करणेकामी रुपरेषा ठरविण्यासाठी संबंधितांची त्वरीत दुसरी बैठक आयोजित करुन कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( मासुळकर समीर मोरेश्वर )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७० /२०१६
दिनांक : ०३/०२/२०१६

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.